# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५५४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः– ०१/०९/२०१६

**१) घरातील चांदी व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक ३१/०८/२०१६ रोजी १२.०० ते १५.०५ वा. दर. यातील फिर्यादी व कुटुंबीय कोणी घरी हजर नसतांनी कोणीतरी अज्ञात चोराने घराचे समोरील दाराचे कडी कोंढा तोडुन आत प्रवेश करून बेडरूम मधील लाकडी कपाटात ठेवलेले प्रत्येकी ५ तोडे चांदीचे २ सिक्के, ३ नग सिक्के चांदीचे प्रत्येकी २ तोडे, प्रत्येकी १ तोडयाचे ३ नग चांदीचे सिक्के, असा एकुण १९ तोडे कि. ३,८००/–रू. चे व नगदी ३६,०००/–रू. व चिल्लर ४,०००/–रू. असा एकुण ४३,८००/–रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी मयुर विजयराव गुनगावकर वय २७ वर्ष रा. न्यु म्हाडा कॉलोनी भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाडे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) अभयारण्यातुन कॅमेराची चोरी . :–**

दिनांक २८/०८/२०१६ चे ०९.०० वा. दर. ते ३०/०८/२०१६ चे ०८.३० वा दर. यातील कोका अभयारण्य क्र. १६९ गांगलवाडा बिट (कवलेवाडा) शिवारातील पाझर टिपॉईटवर लावलेला कॉन्डी बॅग कॅमेरा क्र. सीएच ५८२८५ कि. १५,८००/–रू. चा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी कु. वर्षा वामन हजारे वय २३ वर्ष रा. कोका यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) मोबाईलचा आरएफ केबल वायरची चोरी. :–**

दिनांक २९+३०/०८/२०१६ रोजी चे रात्र पुर्वी. यातील बिएसएनएल. क्र. मोबाईल टॉर्चला लावलेले आरएफ केबल वायर एकुण १२० मीटर लांबीचे कि. १,०००/–रू. चा कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादी सौ. रमाराय गौतमराव चौधरी वय ५० वर्ष रा. कनिष्ठ दुरसंचार अधिकारी,दुरभाष केंद्र पवनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. भोगे पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**४) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, जवाहरनगर, मोहाडी, कारधा, वरठी, साकोली व पालांदुर येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २६३ लिटर हातभट्टी दारु कि. २५,१३०/–रू. व देशी दारू १४ लिटर ७० मिली देशी दारू कि. ३,९००/–रु. तसेच जुगारातुन २,९३०/–रू. असा एकुण कि. ३१,९७०/–रू. चा माल जप्त करण्यात आहे.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.